# संघर्ष यात्रा

वर्ष ९ वे अंक ४८ वा सोमवार दि.१४ जुलै २०२५ आर.एन.आय. MAHMAR/2016/74758 किंमत :१ रू. पाने :-४ पान-१

# मराठवाड्यात यंदा फक्त १६ दिवसच पाऊस



## शेतकऱ्याच्या माथी पुन्हा संकट

छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी

मराठवाड्यातील आठही जिल्ह्यांत यंदा पावसाच्या दिवसांत घट झाली आहे. गेल्यावर्षी १३ जुलैपर्यंत विभागात सरासरी २९ दिवस पावसाचे होते. यंदा फक्त १६ दिवसच पावसाचे ठरले आहेत. चोवीस तासांत २.५ मिलिमीटर किंवा त्यापेक्षा जास्त पाऊस झाला तर तो पावसाचा दिवस गृहीत धरला जातो. यंदा या पावसाच्या दिवसांत मोठी घट झाली आहे.

गेल्यावर्षी १३ जुलैपर्यंत मराठवाड्यातील आठ जिल्ह्यांमध्ये सरासरी २१२.१ मिलिमीटर पाऊस पडणे अपेक्षित होते, मात्र त्या तुलनेत १४४.९ मिलिमीटर पाऊस झाला आहे. गेल्यावर्षी हाच पाऊस या तारखेपर्यंत २६४.१ मिलिमीटर एवढा झाला होता. यंदा या तारखेपर्यंत मराठवाड्यात आठ जिल्ह्यांमध्ये सरासरी ६८.३ टक्के पाऊस झाला आहे. गेल्यावर्षी १२४.५ टक्के एवढा पाऊस झाल्याचे विभागीय आयुक्तालयातील आपत्ती

(पान २ वर)

## राष्ट्रवादीचे नेते धनंजय मुंडे यावर्षी वाढदिवस सोहळा साजरा करणार नाहीत

### सहकारी - कार्यकर्त्यांनी बॅनर, जाहिराती ऐवजी सामाजिक उपक्रम राबविण्याचे आवाहन

### १५ जुलै रोजी भेटीसाठी उपलब्ध नसणार-मुंडेंच्या कार्यालयाकडून माहिती

बीड । प्रतिनिधी

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नेते तथा माजी मंत्री आमदार धनंजय मुंडे यांचा येत्या १५ जुलै रोजी वाढदिवस असून, यावर्षी आपण वाढदिवस साजरा करणार नसून सहकारी व कार्यकर्त्यांनी वाढदिवसाचे सोहळे आयोजित करू नयेत, असे आवाहन धनंजय मुंडे यांनी केले आहे.



धनंजय मुंडे यांचा वाढदिवस हा दरवर्षी चाहते व कार्यकर्त्यांसाठी मोठी पर्वणीच असतो, मात्र यावर्षी मराठवाड्यात बहुतांश भागात पावसाने ओढ दिल्याने शेतकऱ्यांवर दुबार पेरणीचे संकट आहे, दुसरीकडे नुकतेच जवळचे सहकारी स्व. आर. टी. देशमुख यांचे झालेले निधन आदी बाबींचा विचार करून धनंजय मुंडे यांनी वाढदिवस साजरा करणार नसून, सहकारी - कार्यकर्त्यांनी बॅनर बाजी, जाहिराती आदिंवरील खर्च टाळून त्याऐवजी सामाजिक उपक्रम राबवावेत, असे आवाहन केले आहे.

धनंजय मुंडे यांना काही दिवसांपूर्वी बेल्स पाल्सी या आजाराचे निदान झाले होते. त्यानंतर विविध उपचार घेऊन मुंडेंनी इगतपुरी येथील ध्यान केंद्रात विपश्यना देखील केली. आ. धनंजय मुंडे हे येत्या १५ जुलै रोजी ध्यानसाधना करणार असून, ते वाढदिवसाच्या दिवशी शुभेच्छा स्वीकारण्यास परळी वैद्यनाथ किंवा मुंबई वा अन्य कुठेही उपलब्ध असणार नाहीत, असे त्यांच्या कार्यालयाच्या वतीने कळवण्यात आले आहे.

## बीड जिल्ह्यातील गुन्हेगारी थांबता थांबेना! उपसरपंचाला भर रस्त्यावर टोळक्याची मारहाण

बीड । प्रतिनिधी

जिल्ह्यातील गुन्हेगारी विश्वात खरंच पोलिसांचा आणि कायद्याचा धाक उरला आहे की नाही? हा प्रश्न पुन्हा एकदा नव्याने विचारण्याची वेळ आली आहे. त्यामागील कारण म्हणजे बीडच्या निपाणी टाकळी येथील ग्रामसभेदरम्यान उपसरपंच लक्ष्मण चव्हाण यांनी गावात बोगस कामं करून बिलं उचलू नका, असे आवाहन केले होते. या ग्रामसभेनंतर तू ग्रामसभेत बोगस कामासंदर्भात कसा काय बोलला? असा जाब विचारत सरपंच पती भगवान राठोड, जयकोबा राठोड आणि इतर ४ ते ५ जणांकडून माजलगाव-परभणी या रस्त्यावर उपसरपंच चव्हाण यांना काठी दगडाच्या सहाय्याने मारहाण करण्यात आलीय. या मारहाणीत चव्हाण हे गंभीर जखमी झाले आहेत. तर जखमी उपसरपंचावर बीड जिल्हा रुग्णालयात सध्या उपचार सुरू असुन या प्रकरणात अद्याप गुन्हा दाखल झालेला नाही. मात्र या



मारहाणीचा व्हिडिओ समाज माध्यमांवर व्हायरल होतोय.

एकीकडे सरपंच संतोष देशमुख यांच्या मारहाण आणि हत्येनंतर बीडचे नाव संपूर्ण देशभरात गाजत असताना बीड जिल्ह्यातील गुन्हेगारी सातत्याने चर्चेत आली आहे. अशातच माजलगाव-परभणी या रस्त्यावर उपसरपंच चव्हाण यांना किरकोळ वादातून भर दिवसा झालेली मारहाण अनेक प्रश्नचिन्हे उपस्थित करणारी आहे. दरम्यान या प्रकरणी आता पोलीस नेमकी काय कारवाई करतात हे पाहणे महत्वाचे ठरणार आहे. मात्र या निमित्याने बीड जिल्ह्यातील गुन्हेगारीचा मुद्दा पुन्हा ऐरणीवर आल्याचे बघायला मिळाले आहे.

बीडच्या केज तालुक्यातील देवगाव येथील गणेश मुंडे, रामदास मुंडे, पांडुरंग मुंडे आणि एका अज्ञात व्यक्तीने एका हॉटेलमध्ये बसून पिस्तूल सोबत फोटो काढले आणि तेच फोटो व्हाट्सअप स्टेटसला लावले. यानंतर पिस्तूल सोबतचे हे फोटो सर्वत्र व्हायरल झाले आहेत. या प्रकरणात -ठच् -उढ नुसार चार आरोपींच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यापूर्वी बीड जिल्ह्यात अनेक वेळा विनापरवाना पिस्तूल बाळगणाऱ्यांवर कारवाया झालेल्या आहेत. आता या प्रकरणाचा तपास केज पोलिस करत आहेत.

## अॅट्रॉसिटी प्रकरणात विजय पवारला न्यायालयीन कोठडी

बीड । प्रतिनिधी

उमाकिरण शैक्षणिक संकुलातील विद्यार्थिनीच्या लैंगिक छळ प्रकरणात अटकेत असलेल्या विजय पवारवर आणखी एका अल्पवयीन विद्यार्थिनीच्या विनयभंगाचा गुन्हा दाखल झाला होता.



ज्ञानेश्वर पब्लिक इंग्लिश स्कूलमध्ये शिक्षण घेणाऱ्या आठवीच्या वर्गातील विद्यार्थिनीने दिलेल्या तक्रारीनुसार, २०२३ साली विजय पवारने तिच्यासोबत असभ्य वर्तन केले होते. या प्रकाराची पोलिसांकडून चौकशी होऊन त्याच्याविरोधात अॅट्रॉसिटी व पोक्सो कायद्यांतर्गत दुसरा गुन्हा दाखल करण्यात आला होता. मंगळवारी त्याला या प्रकरणात न्यायालयात हजर करण्यात आले. परंतु तपासासाठी काहीही राहिले नसल्याचे कारण देत, पोलिसांनी थेट एमसीआर मागितला. त्यानुसार प्रक्रिया पूर्ण करून विजय पवारला पुन्हा जेलमध्ये पाठवण्यात आले. दरम्यान उमाकिरण संकुलातील विद्यार्थिनीच्या छळ प्रकरणीही तो सध्या न्यायालयीन कोठडीत आहे. या

(पान २ वर)

## जयंत पाटील पायउतार; शशिकांत शिंदे राष्ट्रवादी शरद पवार पक्षाचे नवे प्रदेशाध्यक्ष!

मुंबई । प्रतिनिधी

राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाच्या प्रदेशाध्यक्ष पदावरुन जयंत पाटील पायउतार झाले आहेत. जयंत पाटील यांना प्रदेशाध्यक्षपदाचा राजीनामा दिला आहे. आता शशिकांत शिंदे यांची राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या प्रदेशाध्यक्षपदी निवड झाली आहे. १५ जुलै रोजी शशिकांत शिंदे पक्षाच्या प्रदेशाध्यक्षपदाचा पदभार स्वीकारणार आहेत. गेल्या काही दिवसांआधी जयंत पाटील यांनी प्रदेशाध्यक्षपदावरुन मुक्त करा, अशी मागणी केली होती.

मला प्रदेशाध्यक्षपदातून मुक्त करा अशी मागणी जयंत पाटील यांनी १० जून रोजी झालेल्या पक्षाच्या वर्धापन दिनीच केली होती. मला पवार साहेबांनी बरीच संधी दिली. सात वर्षाचा कालावधी दिला. शेवटी पक्षाने नव्या चेहऱ्यांना संधी देणे आवश्यक आहे. तुम्हा सर्वांदेखत साहेबांना विनंती



करेन, शेवटी पक्ष पवार साहेबांचा आहे. शरद पवारांनी यावर योग्य निर्णय घ्यावा. आपल्याला बरेच पुढे जायचे आहे, असं जयंत पाटील म्हणाले होते. त्यानंतर आज जयंत पाटील यांनी प्रदेशाध्यक्षपदावरुन पायउतार होण्याचा निर्णय घेतला.

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचं प्रदेशाध्यक्षपद मिळणार असल्यासंदर्भातील बातमी प्रसिद्ध होताच शशिकांत शिंदे यांनी एबीपी माझा सोबत संवाद साधला. यावेळी त्यांनी प्रदेशाध्यक्षपदाबाबत अजून नाव निश्चित नाही, पवार साहेब, सुप्रिया ताई, जयंत पाटील आणि पक्ष जो निर्णय घेईल तो मान्य असेल. १५ तारखेला पक्षाची बैठक आहे, काही नावं चर्चेत आहेत, माझंही नाव चर्चेत आहेत. ज्यावेळेला निर्णय होईल, निवड होईल त्यावेळी निश्चितपणानं काम करु, असं शशिकांत शिंदे म्हणाले. शशिकांत शिंदे पुढं म्हणाले, आणखी कुणाची नावं चर्चेत आहेत याबद्दल कल्पना नाही. मला तुमच्याकडून कळलेलं आहे. संघटनेच्या माध्यमातून पवारसाहेबांनी या महाराष्ट्रात इतिहास

(पान २ वर)

## जीवंत असताना मृत घोषित केलेल्या बाळाची प्राणज्योत अखेर मालवली



अंबाजोगाई । प्रतिनिधी

अंबाजोगाईच्या स्वामी रामानंद तीर्थ' रुग्णालयात एक धक्कादायक प्रकार समोर आला होता. प्रसूतीनंतर जिवंत नवजात बाळाला डॉक्टरांनी मृत घोषित केलं होते. या घटनेमुळे एकच खळबळ उडाली होती. पण आता दुर्दैवाने त्या बाळाची प्राणज्योत मावळली आहे. बालरोग विभागातील अतिदक्षता विभागात उपचार घेत असतानाचं बाळाने अखेरचा श्वास घेतला. या घटनेमुळे रूग्णालयाचा कारभार पुन्हा एकदा चव्हाट्यावर आला आहे. या घटनेची गांभीर्याने दखल घेत 'स्वा.रा.ती.रुग्णालय' प्रशासनाने चौकशीचे आदेश दिले आहेत.

(पान २ वर)

# संपादकीय

## असेही गुरू..!


गुरुपौर्णिमा सर्वत्र जोमदारपणे सर्वत्र साजरी झाली. गुरू-शिष्य परंपरा हे भारतीय संस्कृतीचे आगळे-वेगळे वैशिष्ट्य आहे आणि अशा प्रकारचे नातेसंबंध जगात अन्यत्र कुठेही नसतात. आपल्या शिष्याला नेहमी उन्नत करण्याच्या उद्देशाने गुरु त्याच्यावर संस्कार करत असतात आणि त्याचबरोबर शिष्यही समर्पित भावनेने गुरूंच्या आज्ञा ऐकत असतात. आजकालच्या काळात चांगले गुरु मिळणेसुद्धा दुरापास्त झाले आहे. या ठिकाणी गुरू आणि शिक्षक यांच्यामधील फरक समजावून घेतला पाहिजे. शिक्षक हे विद्यार्थ्याला ज्ञानदान करण्याचे कार्य करत असतात. औपचारिक शिक्षण देऊन त्याला स्वतःच्या पायावर उभे करण्यासाठी शिक्षक सतत कार्य करत असतात. त्यांच्या प्रति आपण नेहमीच कृतज्ञ पाहिजे. जीवनाच्या संघर्षात किंवा भवसागरात शिष्य योग्य मार्गावर चालावा यासाठी गुरु प्रयत्न करत असतात. योग्य वाट दाखवतो तो खरा गुरू असे म्हटले जाते. आजच्या काळात काही गुरुंचे स्वतःचे आचरण असे असते की, ते शिष्यांना या वाटेने जाऊ नकोस, असे सांगत असावेत. बहुतांश विद्यार्थी गुरुपौर्णिमेच्या दिवशी आपल्या वंदनीय शिक्षकांची आठवण काढून त्यांना वंदन करत असतात. सगळेच शिक्षक काही गुरुपदाला पोहोचलेले नसतात. ते बिचारे आपले नोकरी करून जमेल तसे ज्ञानदान करत असतात. ग्रामीण भागात पाहिले तर शिक्षक नावाचा गुरु विद्यार्थ्यांना सर्वांगीण शिक्षण देत असतो. असे सर्व गुरू नसतात. उदाहरणार्थ काही शिक्षक शालेय कामकाजाकडे दुर्लक्ष करून थेट राजकारणाच्या आखाड्यामध्ये उतरलेले दिसून येतात. गाव छोटे असेल तर ते थेट ग्रामपंचायतीच्या निवडणुकीमध्ये रस घेत पंच आणि सरपंच यांनाही मार्गदर्शन करत असतात. ग्रामीण भागात शिक्षकांना विशेष मान असतो. कारण छोट्याशा गावामध्ये ते सर्वात अधिक शिकलेले असतात. अशा या प्रशिक्षणाचा फायदा अनेक विद्यार्थ्यांना होत असतो. एखादा खोडकर विद्यार्थी पुढे राजकारणात आला आणि जिल्हा परिषद अध्यक्ष वगैरे झाला तर शिक्षकांना आपली बदली पाहिजे त्या करून घेण्यासाठी त्यांचा उपयोग होत असतो. आपल्या शाळेत शिकलेले काही विद्यार्थी आयएएस किंवा आयपीएस झाले तर गुरूंना त्यांचा अभिमान असतो. शिक्षकाचे काम हे पाणपोईसारखे असते. कोणीही वाटसरू पाणी प्यायला आला तर त्याला पाणी देण्याचे काम पाणपोईवर होत असते. तसेच एकाच वेळी असंख्य विद्यार्थ्यांना शिकवणारे शिक्षक आपापल्या पद्धतीने त्यांच्यावर संस्कार घडवत असतात आणि शिक्षण देत असतात. काही विद्यार्थी घडतात. काही बिघडतात. त्याला शिक्षकांचा म्हणजे त्यांच्या गुरूंचा अर्थातच नाईलाज असतो. आज सर्वत्र पाहिले तर घडवणारे शिक्षक आहेत आणि बिघडविणारे पण शिक्षक आहेत. आपले शिक्षक आपले गुरू आहेत ही भावना संस्कृतीमध्ये कायम आहे. ही भावना कायम आहे, तोपर्यंत शिक्षकांच्या प्रति गुरुभाव वाढत राहील यात शंका नाही.

# महाराष्ट्रसह इतर किल्लेही युनेस्कोच्या जागतिक वारसा यादीत

मुंबई । प्रतिनिधी

छत्रपती शिवाजी महाराज यांचे किल्लेवैभव असलेले १२ किल्ले हे युनेस्कोच्या जागतिक वारसा यादीत समाविष्ट झाले आहेत. 'अद्वितीय वैश्विक मूल्य' म्हणून त्याचा आता समावेश करण्यात आला आहे. यात महाराष्ट्रातील ११ किल्ले रायगड, राजगड, प्रतापगड, पन्हाळा, शिवनेरी, लोहगड, साल्हेर, सिंधुदुर्ग, विजयदुर्ग, सुवर्णदुर्ग, खांदेरी तसेच तामिळनाडूतील एक जिंजी या किल्ल्यांचा समावेश आहे.

जिंजीचा किल्ला हा भारताच्या तमिळनाडू राज्यातील एक किल्ला आहे. ह्या किल्ल्याला राजगड आणि रायगडनंतर स्वराज्याची तिसरी राजधानी म्हणून ओळखतात. दक्षिणेचा ट्रॉय म्हणून ओळखला जाणारा हा किल्ला भारतातील सर्वात मजबूत किल्ल्यांपैकी एक मानला जातो. छत्रपती शिवाजी महाराज दक्षिण दिग्विजय मोहिमेवर असताना महाराजांनी जिंजी किल्ल्यावर ताबा मिळवला. पूर्वी असलेला किल्ला पाडून नव्याने महाराजांनी हा किल्ला बांधून घेतला. मराठ्यांच्या इतिहासात दुर्गराज रायगडला जितकं महत्व आहे तितकंच महत्व जिंजीच्या किल्ल्याला सुध्दा आहे. शिवछत्रपतींच्या निधनानंतर औरंगजेब स्वराज्यावर चालून आला. छत्रपती संभाजी महाराजांना फंदफितूरीने पकडून छळ करुन



मारण्यात आले. त्यावेळी स्वराज्य रक्षणासाठी छत्रपती राजाराम महाराज जिंजीला गेले आणि तिथून राज्यकारभार पाहू लागले. राजाराम महाराजांनी ८ वर्षे या गडावरुन राज्यकारभार पाहीला.यामुळे औरंगजेबाला आपले निम्मे सैन्य दक्षिणेकडे पाठवावे लागले. परिणामी स्वराज्यावरील मुघल सैन्याचा दबाव कमी झाला व मराठ्यांनी गेलेले किल्ले व प्रदेश पुन्हा जिंकून घेतले.

जिंजीसारखा अभेद्य किल्ला पाहताना महाराजांच्या दूरदृष्टीची जाणीव पदोपदी होत होती. पूर्वी या ठिकाणी कृष्णगिरी, राजगिरी, चंद्रयान दुर्ग (चंद्रगिरी) हे वेगवेगळे तीन किल्ले होते. तिथे संरक्षणाच्या दृष्टीने तटबंदी बांधून तिघांचा मिळून एक किल्ला शिवाजी महाराजांनी केला. जिंजी किल्ल्याचे दुर्गमत्त्व त्याच्या नैसर्गिक व भौगोलिक परिस्थिती वरुन कळतेच पण त्याच बरोबर उपलब्ध परिस्थितीचा पुरेपूर विचार करण्यात आला आहे. लष्करी वास्तुशास्त्रीय बाबींचा सखोल विचार करून तटबंदीची शृंखला, निर्माण केली. आजही साधारणतः ११ किलोमीटर लांबीची तटबंदी आपल्याला पहायला मिळते. तसेच टेहाळणी बुरुज, खंदक, राहण्याच्या जागा, पावसाच्या पाण्याचे नियोजनासाठीचे तलाव व टाके, पाण्याच्या टाक्यांचा संरक्षणदृष्टया वापर अतिशय खुबीने केलेला आहे. यामुळे हा किल्ला अधिकच अभेद्य बनला. वास्तूशास्त्र व युध्दशास्त्राच्या दृष्टीने जिंजी हा उत्कृष्ट असा किल्ला आहे.

# गुरुकडून ज्ञानासोबत समर्पणाची भावना शिकली पाहिजे-विठ्ठल काळे

बीड । प्रतिनिधी

स्वा. सावरकर माध्यमिक विद्यालयात गुरु पौर्णिमा साजरी करण्यात आली. अध्यक्षीय समारोप करताना मुख्याध्यापक श्री विठ्ठल काळे यांनी विद्यार्थ्यांना सांगितले की, आपल्या जीवनात गुरूचे, शिक्षकांचे स्थान व महत्त्व अनन्यसाधारण आहे. गुरू शिवाय आपण जीवनात सद्गती प्राप्त करु शकत नाही. गुरुकडून ज्ञानासोबत समर्पणाची भावना शिकली पाहिजे.

विद्यासभा उपाध्यक्ष तथा कें.का.सदस्य मा. उमेश जगताप यांनी आपल्या मनोगतात सांगितले की, गुरूंच्या आशीर्वादाने व मार्गदर्शनाने आयुष्यातील प्रत्येक टप्प्यावर यश प्राप्त करु शकतो. त्यांच्यामुळे आपल्याला प्रेरणा मिळते. आपल्या जीवनाची दशा व दिशा बदलण्याची क्षमता फक्त गुरूमध्ये असते. असे प्रतिपादन जगताप यांनी केले. विषय मांडणी करताना श्री. रमण कुलकर्णी यांनी गुरुपौर्णिमेचे महत्त्व सांगताना आपली परंपरा ही गुरुशिष्य नात्याला धरुनच उभी राहिली आहे. असे सांगून महर्षी व्यासांबद्दलची माहिती दिली. आणि भारतीय संस्कृतीमध्ये गुरुपौर्णिमेचे अनन्यसाधारण महत्त्व आहे असे प्रतिपादन केले. यावेळी विद्यालयातील विद्यार्थ्यांनी व शिक्षकांनी समर्पण म्हणून यथायोग्य मुल्याचे दान स्वरुपात समर्पण केले. यावेळी व्यासपीठावर प्रमुख पाहुणे म्हणून केंद्रिय कार्यकारिणी सदस्य तथा विद्यासभा उपाध्यक्ष मा उमेश जगताप, अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक श्री विठ्ठल काळे, प्रमुख वक्ते श्री. रमण कुलकर्णी व अभ्यास पूरक प्रमुख सौ सुलक्षणा खणके हे उपस्थित होते. चि. सार्थक क्षीरसागर या विद्यार्थ्याने गुरु वर आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन सौ. सविता कुलकर्णी यांनी व आभार प्रदर्शन श्री. विनायक कुलकर्णी यांनी केले. कल्याणमंत्र श्री. मुकुंद मिरगे यांनी म्हटला.

## पान एक वरून

### मराठवाड्यात यंदा..

व्यवस्थापनातील सूत्रांकडून सांगण्यात आले.

यंदा जुलै महिन्यात रविवार(ता. १३)पर्यंत सकाळी साडेदहापर्यंतच्या नोंदीनुसार मराठवाड्यात ३८.२ मिलिमीटर पाऊस झाला आहे. जूनपासून विभागामध्ये आतापर्यंत २१२.१ मिलिमीटर पाऊस पडणे अपेक्षित होते. मात्र, त्या तुलनेत १४४.९ मिलिमीटर पाऊस झाला आहे.

यामध्ये छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात १७३.६ (आतापर्यंत अपेक्षित १८९.० मिलिमीटर) मिलिमीटर पाऊस झाला आहे. जालना जिल्ह्यात १४८.४ (२०२.४ ), बीडमध्ये ८०.७ (१८२.०), लातूरमध्ये १०१.८ (२१३.८), धाराशिव १३१.३ (१८४.४), नांदेड २०९.३ (२५७.८), परभणी ११६.२ (२३७.२) तर हिंगोली जिल्ह्यात जूनपासून रविवार (ता. १३)पर्यंत १९१.८ (आतापर्यंत अपेक्षित २६५.७ मीलीमीटर) मिलिमीटर पाऊस झाला आहे. विभागात सरासरी ४९.९ टक्के पाऊस झाला आहे.

गेल्यावर्षी १३ जुलैपर्यंत सात दिवस पावसाचे होते. त्यात एक जुलै २०२४ रोजी मराठवाड्यात सरासरी १५.२ मिलिमीटर, तीन जुलै रोजी ९.९, सात जुलै रोजी ४.८, आठ जुलै १६.६, नऊ जुलै १९.२, दहा जुलै रोजी ४.३ आणि १३ जुलै २०२४ रोजी ४.२ मिलिमीटर पाऊस झाला होता. तर, यावर्षी १३ जुलै २०२५ पर्यंत पावसाचे सहा दिवस झाले आहेत. यामध्ये एक जुलै ४.३, दोन जुलै ८.६, तीन जुलै ३.२, सहा जुलै ३.१, सात जुलै ५.६, आठ जुलैला ४.० मिलिमीटर एवढा पाऊस झाला आहे.

### जयंत पाटील पायउतार...

घडवला काम केल, पक्ष संघटना बांधली आहे. आज पक्षाच्या माध्यमातून काम करण्याच्या बाबतीत संघर्षाचा काळ आहे. त्यावेळेला निश्चितपणानं लोकांना अपेक्षित अशा प्रकारचं नेतृत्व पवार साहेबांनी उभं केलेलं आहे. जयंत पाटील यांच्या सारख्या अध्यक्षांनी ज्या पद्धतीनं काम केलेलं आहे, त्याची तुलना होऊ शकत नाही, असंही शिंदे यांनी म्हटलं. प्रदेशाध्यक्षपदाबाबत पक्षाचा अजून निर्णय झालेला नाही, पक्षाची बैठक आहे एवढाच निरोप आलेला आहे. निर्णय काय होईल तो होईल, पक्ष बांधण्याच्यासाठी संघर्षात आम्ही एकजुटीनं, एकोप्यानं उभं राहू, साहेबांच्या पक्षाची प्रतिष्ठा वाढवण्याचा प्रयत्न १०० टक्के करु, असं शशिकांत शिंदे म्हणाले.

### ॲट्रॉसिटी प्रकरणात...

दोन्ही प्रकरणांत तपास सुरू असून आतापर्यंत ३६ हून अधिक लोकांचे जबाब नोंदवले गेले आहेत. विशेष पथक या संपूर्ण प्रकरणाचा तपास करत असून इतर विद्यार्थिनीचे जबाब घेण्याची प्रक्रिया सुरू आहे.

### जिवंत असताना...

अंबाजोगाई येथील स्वामी रामानंद तीर्थ रुग्णालयात एका बाळाला जन्मानंतर मृत घोषित करण्यात आले होते. बाळाची योग्यरित्या तपासणी न करता हा निर्णय घेण्यात आला होता. कुटुंबियांनी बाळाला घरी आणले, जिथे अंत्यसंस्काराची तयारी सुरू होती.याच वेळी बाळ अचानक रडू लागले. बाळाचे रडणे ऐकून कुटुंबियांना सुखद धक्का बसला आणि त्यांनी तातडीने बाळाला पुन्हा रुग्णालयात दाखल केले. 'त्या' बाळावर बालरोग विभागातील अतिदक्षता विभागात उपचार सुरु होते. 'त्या' बाळाचा ११ जुलै शुक्रवार रोजी रात्री मृत्यू झाल्याची घटना घडली. आहे. या घटनेमुळे बाळाची आई बालिका घुगे व त्यांच्या कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.

या गंभीर प्रकरणाची चौकशी करण्यासाठी रुग्णालय प्रशासनाने दोन समित्यांची नियुक्ती केली आहे.

एका समितीमध्ये संबंधित विभागाचे विभागप्रमुख आहेत, ज्यांना तात्काळ चौकशी करून अधिष्ठातांना अहवाल सादर करण्याचे आदेश दिले आहेत. दुसरी समिती इतर विभागांमधील प्राध्यापक आणि विभागप्रमुख अशा पाच जणांची आहे, त्यांनाही या घटनेची चौकशी करून तात्काळ अहवाल सादर करण्यास सांगितले आहे. 'आम्ही स्वतःहून या प्रकरणाची चौकशी करण्यासाठी दोन कमिट्या तयार केलेल्या आहेत,' असे रुग्णालय प्रशासनाकडून सांगण्यात आले.

# अस्वस्थ समाजाचा नायक
# खंडेराव जगदाळे सर



ऑगस्टमध्ये अमळनेर येथे 'व्हॉईस ऑफ मीडिया'च्या प्रमुख पदाधिकाऱ्यांचा 'केडर कॅम्प' आयोजित केला आहे. त्या 'केडर कॅम्प'च्या अनुषंगाने माझी 'व्हॉईस ऑफ मीडिया'च्या काही पदाधिकाऱ्यांसोबत 'प्रेस क्लब'मध्ये बैठक आयोजित केली होती. बैठक संपली आणि मी 'प्रेस क्लब'च्या बाहेर गाडीची वाट बघत थांबलो होतो. थोड्या वेळाने मी बाजूच्या रस्त्यावर पाहिले, तर आझाद मैदानावर जी आंदोलन होतात, त्या आझाद मैदानाच्या गेटच्या अलीकडे एक माणूस आणि त्याच्या समवेत काही जण अगदी रस्त्याच्या कडेला बसले होते. त्यांच्यात मोठ्याने संवाद चालू होता. पहिल्यांदा मला वाटलं की, त्या माणसाचा अपघात झालाय, त्याला काहीतरी लागलंय म्हणून, तिथे चार माणसं जमली आहेत. मी थोडा पुढे गेलो, तेव्हा तिथे एका माणसाच्या पायावर असणाऱ्या जखमांवर शांतपणे पाणी टाकणारी माणसं मी पाहात होतो. आझाद मैदानातून बाहेर येणारी अनेक माणसं, त्या पायाला जखमा असणाऱ्या माणसाला नमस्कार करत होते. तो माणूस उठायचा, थोडा चालायचा आणि पुन्हा पायाची खूप आग होते म्हणत जागेवर बसायचा. पुन्हा ती माणसं, त्या माणसाच्या पायावर पाणी टाकायची. तो माणूस सोबतच्या माणसांना म्हणत होता, पायाची भयंकर आग उठली हो, दहा-पंधरा काही कळालं नाही, आता थोडसं मन स्थिरावले, तर पायाकडे लक्ष जाते. तो पायाला जखमा असलेला माणूस आणि त्याच्या सोबत असणारी माणसं, एकमेकाला बोलत होती, आणि ते मी ऐकत होतो. महाराष्ट्राला उगाच फुले, शाहू, आंबेडकरांचा महाराष्ट्र म्हणत नाहीत, तर इथं काम करणारी अनेक साधीसुधी माणसंसुद्धा, त्याच फुले-शाहू- आंबेडकरांचा वारसा पुढे चालवताना दिसतात. तो पायाला, जखमा झालेला माणूस, त्याच फुले, शाहू, आंबेडकरांचा वंशज आहे, ज्यातून त्याच्या पायाला जखमा झाल्या होत्या. तो जखमा असलेला माणूस आणि त्याच्यासोबत असणारी माणसं कोण आहेत? तिथं ते का बसलेत. येणारी - जाणारी माणसं त्यांना नमस्कार का करतात. इथपासून ते 'त्या' पायाला जखमा असणाऱ्या माणसाचा सगळा प्रवास, मी रस्त्यावरच अनुभवत होतो. हा आपला सारा अस्वस्थ समाज, या समाजाला जागे करायचे, त्यांना न्याय मिळवून देण्याचं काम करणारे अनेक 'नायक' म्हणून या महाराष्ट्राची खास वैशिष्ट्ये आहेत. तसे 'ते' पायाला जखमा असलेले व्यक्ती होते. कोण म्हणते देत नाही? घेतल्याशिवाय राहत नाही, या भूमिकेच्या पलीकडे जाऊन काम करणारी ही माणसं खऱ्या अर्थाने त्या 'अस्वस्थ समाजाचे नायक आहेत'. या जखमा असणाऱ्या व्यक्तीची कहाणीसुद्धा तशीच आहे, अगदी अस्वस्थ करणारी. 'त्या' पायाला जखमा असणाऱ्या माणसाच्या जखमा ह्या केवळ त्याच्या पायाच्या जखमा नव्हत्या, तर राज्यात अस्वस्थता पेरणारी समाजव्यवस्था होती, त्याचे चित्र स्पष्ट करणारे बोलके स्वरूप होते. ज्या जखमा असणाऱ्या व्यक्तीला मी बोलत होतो, त्यांचं नाव खंडेराव शिवाजीराव जगदाळे. गाव शिरोळ, जिल्हा कोल्हापूर. जगदाळे मास्तर पेशाने शिक्षक. सुरुवातीला 'ते' नोकरी करीत असलेल्या त्यांच्या शाळेवर पगार नव्हता, म्हणून त्यांनी आंदोलनाचा नारा दिला होता. त्यातून त्यांना मिळालेल्या दुसऱ्या शिक्षकांचा प्रतिसाद, मग तिसऱ्याचा प्रतिसाद, असं करत करत जगदाळे मास्तरांनी हजारो शिक्षकांना घेऊन संपूर्ण राज्यात संघटना बांधली. त्या बांधणीमधून महाराष्ट्र राज्य कायम विनाअनुदानित संघटनेचा जन्म झाला. शिक्षकांना न्याय मिळवून देण्यासाठी या संघटनेने जोरात काम उभे केले, ज्याला प्रचंड यश मिळाले. राज्यात अनुदानाचा 'टेकू' घेऊन एक-दोन नव्हे, तर तब्बल ६५ हजार शाळा आहेत. तिथे काम करणाऱ्या ६२ हजार शिक्षकांना शासनाचे अनुदान कसे मिळेल, त्यांची चूल कशी पेटेल, याची पूर्ण जबादारी या संघटनेने घेतली. शासनाचे निकष आणि नियमावली ही अनुदानासाठी ठरलेली आहे, पण ते वेळेत कधीच होत नाही. त्यातून शैक्षणिक अस्वस्थता टोकाला गेली आहे. या ६५ हजारांपैकी काहींना २० टक्के, काहींना ४० टक्के, तर काहींना ६० टक्के असा पगार मिळतो. पण ज्यांना



वीस वीस वर्ष नोकरी करूनही, काहीच पगार मिळत नाही, अशा शिक्षकांची संख्या या महाराष्ट्रात २३ हजारांपेक्षा जास्त आहे. मग काय? तर आंदोलन करा. लढा उभारा आणि न्याय पदरात पाडून घ्या. यासाठी जगदाळे मास्तरांनी जिवाचं रान केलं. प्रत्येक पीडित माणसामधला शिक्षक जिवंत राहावा, यासाठी पुढाकार घेतला.

गेल्या पंधरा दिवसांपासून जगदाळे मास्तर अनेक पीडित शिक्षकांना घेऊन, 'महाराष्ट्र राज्य कायम विनाअनुदान संघटनेच्या झेंड्याखाली आझाद मैदानावर उपोषणाला बसलेले होते. या संघटनेच्या हाकेला 'ओ' देऊन अनेक संघटना एकत्रित आल्या. त्यांनी सर्वांच्या वतीने लढा दिला. आजच या लढ्याचा यश मिळाले. या लढ्याने राज्यातल्या ५० हजाराहून अधिक शिक्षकांना थोड्या प्रमाणात का होईना फायदा झाला. त्यांना न्याय मिळाला आणि जगदाळे मास्तरांचे उपोषण, आंदोलन सुटलं. लढ्याचा तंबू आवरून जगदाळे मास्तर दुसऱ्या आदोलनच्या दिशेने निघाले होते. जगदाळे मास्तरांच्या सोबत असलेल्या शिक्षकांशी माझं बोलणं सुरू होतं. ते मला सारे काही सांगत होते.

मी जगदाळे मास्तरला विनंती केल्यावर काहीतरी पाहुणचार घेण्याच्या उद्देशाने आम्ही 'प्रेस क्लब'च्या दिशेने निघालो. आम्ही रस्त्याने जात असताना मागून एका महिलेने आवाज दिला. 'ती' महिला म्हणाली, 'सर, पुढच्या आठवड्यात माझ्या मुलीचे लग्न आहे. तुम्ही सगळ्यांनी मिळून हातभार लावला, म्हणून मुलीचा संसार लागला. तुम्ही लग्नाला नक्की या'.

जगदाळे मास्तरांनी हात जोडत, 'त्या' महिलेला मी नक्की येतो, असा निरोप दिला. माझ्याकडे पाहात 'त्या' महिलेकडे बोट दाखवत, जगदाळे मास्तर म्हणाले, संदीपराव, ही ताराबाई जाधव. ह्या सांगलीच्या आहेत. संगमेश्वर जाधव या शिक्षकाच्या 'त्या' पत्नी आहेत. संगमेश्वर यांनी सतरा वर्ष पगार मिळेल, याची वाट पाहिली. संगमेश्वर दिवसभर शाळा करायचे आणि रात्री शेतीचे काम करायचे. सतरा वर्षांनी बिचाऱ्या संगमेश्वरचा संयम सुटला. संगमेश्वरने कमरेला दगड बांधून विहिरीत उडी मारली. काहीतरी मावेजा मिळावा यासाठी 'ही' महिलाही आमच्या समवेत अनेक वर्ष आंदोलनात आहे. आम्ही सर्वांनी ताईला मदत व्हावी, यासाठी पुढाकार घेतला. मुलांचे शिक्षण झाले. आता लग्न होत आहे. अजून या महिलेला न्याय मिळाला नाही. मी 'त्या' ताराबाईशी बोलत होतो. माझ्या मनात अनेक प्रश्न निर्माण होत होते. ताराबाई मला म्हणाल्या, दादा घरातला कर्ता माणूस गेला आणि उमेदीचे दिवस संपले की, आयुष्यात शिल्लक काही उरत नाही. त्रासातून सुटण्यासाठी पुरुष मरतात. महिलांचं तसं नसतं. त्यांना सगळ्या परिस्थितीला सामोरे जावे लागते. जगदाळे सरांसारखे पाठीराखे भाऊ माझ्या मागे नसते तर, मीही माझ्या आयुष्याला आत्महत्येची दोरी लावली असती. माझे पती गेले त्यांच्या पाठोपाठ, 'त्यांचे' आई-वडील गेले, नंतर माझे आईवडील गेले. पाहता पाहता आयुष्यातला सगळाच आधार मावळला.

उपासपोटी, ज्ञान देणारे शिक्षक, त्यांच्या कार्याला किती न्याय देत असतील, हे त्यांचे त्यांनाच माहिती! या शिक्षकाला शिक्षणाला न्याय देत असताना, त्या शिक्षकाला एकीकडे समोर बसलेली उद्याची पिढी दिसत असेल, आणि दुसरीकडे त्यांच्या घरी त्यांचे उपाशी असलेले मुलंबाळं दिसत असतील. सारे काही धक्कादायक होते. मी एकदम भानावर आलो. ताराबाईच्या संवादातून माझ्या मनात अनेक प्रश्न निर्माण होत होते. ताराबाईच्या पतीची आई, ताराबाईची आई यांच्यामध्ये होणारा संवाद सांगून ताराबाई अश्रूंना वाट मोकळी करून देत होत्या. अत्यंत भावनिक असणारे जगदाळे मास्तर, त्या बाईला शांत करण्याऐवजी स्वतःचे अश्रू खिशातल्या रुमालाने पुसत होते. ताराबाई स्वतः सावरली आणि म्हणाली, सर मी निघते. गाडीची वेळ झाली. सोबत आणखीन महिला आहेत. जगदाळे मास्तरनी 'त्या' महिलेकडे पाहायची हिंमतही केली नाही. तिला नमस्कार करत, ते शांतपणे जागेवर उभे राहिले. ताराबाईसारख्या एक दोन नाही तर, महाराष्ट्रात एकशे सत्तर महिला

**संदीप काळे**
**व्हाईस ऑफ मीडिया,मुंबई**

आहेत, ज्यांच्या पतीने पगार मिळत नाही म्हणून, आत्महत्या केली. त्यांच्यानंतर त्यांची मुलं, त्यांची पत्नी, त्यांचे आई-वडील या सगळ्यांचा मुख्य आधार गेला. कुणाचा शिक्षणावर विश्वास राहिला नाही. कुणाचा शिक्षण संस्थांवर विश्वास राहिला नाही. सरकारवर तर नाहीच नाही. थोडा वेळ 'ती' महिला आमच्या गप्पांमध्ये सहभागी झाली आणि पुन्हा माझी रेल्वे आहे म्हणून परतीच्या प्रवासाला निघाली.

आम्ही रस्त्याने चालत होतो. मी जगदाळे मास्तर यांना विचारले, जखमा का झाल्या तुमच्या पायाला? चप्पल का घालत नाहीत? काही त्रास आहे का?

त्यावर जगदाळे मास्तर काहीच बोलले नव्हते. जगदाळे मास्तरांसोबत असलेले शिक्षक म्हणाले, गुरुजींनी एक 'पण' केला आहे. मी म्हणालो 'काय?' त्यावर तो शिक्षक म्हणाला, जोपर्यंत राज्यातल्या प्रत्येक शिक्षकाला पूर्ण पगार मिळणार नाही, तोपर्यंत पायात चप्पल घालणार नाही, असे त्यांनी ठरवले आहे. सतत प्रवास, आंदोलने, उपोषण यातून पायाला दम नाही. 'तो' शिक्षक आणि मी बोलताना जगदाळे मास्तर म्हणाले, माझे कौतुक सोडा, तुमचे सांगा. जगदाळे मास्तर यांच्या बोलण्यानंतर 'ते' शिक्षक काहीच बोलले नाहीत. ते गप्प गप्प होते. मग जगदाळे मास्तरनीच 'त्या' शिक्षकांचा इतिहास सांगितला. 'ते' शिक्षक सिद्धार्थ गायकवाड सोलापूरचे आहेत. गेल्या १५ वर्षांपासून ते एका शाळेवर काम करतात, पण त्यांची चूल पेटत नाही, म्हणून ते शाळेचे काम झाल्यावर एका शेतामध्ये म्हशींचा गोठा सांभाळण्याचे काम करतात. जगदाळे मास्तरसोबत असलेले दुसरे शिक्षक संतोष पवार हे उस्मानाबादचे आहेत.



'ते' शाळा झाल्यावर रात्री एका लाकडाच्या घाण्यावर काम करतात. त्यांना बारा वर्षांपासून पगार नाही. जगदाळे मास्तर त्या दोघांची आणि त्यांच्यासारख्या हजारो शिक्षकांची व्यथा मला सांगत होते.

आम्ही चालत चालत 'प्रेस क्लब'ला पोहोचलो. बऱ्याच वेळापासून जगदाळे मास्तर यांचा फोन वाजत होता. त्यांनी तो फोन घेतला आणि तिकडून येणाऱ्या महिलेचा शांत आवाज आम्ही ऐकत होतो. ती महिला तिकडून बोलत होती, काहीतरी खाऊन घ्या. तब्येतीकडे दुर्लक्ष करू नका. तो फोन चालू असताना मी जगदाळे मास्तरांना म्हणालो, कुणाचा फोन आहे? आईचा आहे का?' जगदाळे मास्तर म्हणाले, नाही माझ्या पत्नीचा आहे.

मी म्हणालो, मी बोलू शकतो का?'

जगदाळे मास्तरनी माझी ओळख त्यांच्या पत्नीला करून देत लगेच माझ्याकडे फोन दिला. आमचा नमस्कार झाल्यावर तिकडनं जगदाळे मास्तरच्या पत्नी मला म्हणाल्या, सर, तब्येतीची काळजी घेत नाहीत, म्हणून वारंवार फोन करावा लागतो.

बोलताना जगदाळे वहिनींनी घरची सगळी माहिती माझ्यासमोर ठेवली. जगदाळे मास्तरांना मानसी आणि दुर्गा नावाच्या दोन कन्या आहेत. मानसी सध्या एम. एस. सी.नंतर बी. एड करते आहे आणि दुर्गा दहावीला आहे. आई शकुंतला आणि वडील शिवाजीराव हे दोघेही आता हयात नाहीत. त्यांनी हाती घेतलेलं काम हे फार मोठं आहे. आम्ही परिवार म्हणून त्यांच्या पाठीमागे आहोत. आमचं म्हणणं फक्त एवढंच आहे, की त्यांनी स्वतःची काळजी घेतली पाहिजे'. असं म्हणून जगदाळे वहिनींनी फोन ठेवला. आमच्या गप्पा रंगल्या. 'प्रेस क्लब'मध्ये आम्ही चहानंतर जेवण घेतले. जेवताना जगदाळे मास्तर म्हणत होते, आज माझे पन्नास हजार शिक्षक आनंदाने जेवणार आहेत. गेले पंधरा दिवस आम्ही अधिवेशनाच्या पार्श्वभूमीवर उपोषणाला बसलो होतो. सरकारला आमचं म्हणणं पटलं आणि आज पन्नास हजार शिक्षकांना न्याय मिळाला. मग काय शिक्षक, समाज, शिक्षणव्यवस्था, राजकारण या सर्व विषयांवर जगदाळे मास्तर माझ्याशी बोलत होते. आम्ही बोलत असताना विजय तळपे नावाचे एक शिक्षक जगदाळे मास्तर यांना भेटायला आले. त्यांची ओळख करून देताना जगदाळे मास्तर म्हणाले, हे विजय आहेत. विजयचे तीन लग्नं मोडले. बायका निघून गेल्या. आता वय वर्ष ४६ आहे. या वयात यांना बायको कोण देणार? प्रत्येक वेळेला जेव्हा लग्नाचा विषय निघतो, तेव्हा पोरीचा बाप मला फोन करतो आणि विचारतो, सर मी माझी मुलगी देतो, पण मागची मुलगी विजयला पगार नाही म्हणून निघून गेली. विजयला पगार सुरू होणार आहे ना सर? मी अगदी आत्मविश्वासाने म्हणतो, हो मग, होईल ना? तुम्ही काही काळजी करू नका असे अनेक विजय प्रत्येक गावात आहेत. माझी भाबडी अशा असते, की वीस टक्के होईल. चाळीस टक्के होईल. काहीतरी होईल आणि माणसं उभे राहतील. माणसं खचून जाणार नाहीत, असे वाटते. पण अनेक वेळा शासन पदरी निराशाच टाकते. मी म्हणालो, इतके सगळे शिक्षक आमदार आहेत. इतकं मोठं राजकीय पाठबळ आहे त्याचं काय करायचं?' त्यावर जगदाळे मास्तर म्हणाले, हे सगळे शिक्षक आमदार भाषणापुरते आहेत. आश्वासनाच्या खैरातीवर आपली पोळी भाजून घ्यायची आणि पुढे जे गरजवंत आहेत त्यांना टाटा बाय-बाय करत आपण मस्त जगायचं. याच्या पलीकडे या आमदारांचे काहीच काम नाही. बरं, बिचारे सगळे हो हो म्हणतात, पण करत काहीच नाहीत. काही मिळाल्यावर मात्र श्रेय घेण्यासाठी यांच्या उड्या पडलेल्या असतात. सतरा-सतरा वर्ष फुकट नोकरी करायची आणि पुढे पैसे मिळाले तर त्याचं काय करायचं? कारण पूर्ण आयुष्य संपलेलं असतं. अशी अवस्था सगळीकडे आहे. जगदाळे मास्तरांचा प्रत्येक प्रश्न काळजाला भाजून शिवून काढणारा होता. शासनाच्या सगळ्या निकषांत बसत असूनही शासन अनुदान पदरात टाकायला का वेळ लावते? या प्रश्नाचे उत्तर कधीच मिळत नाही. अनुदानित शाळांवर दरवर्षी पंचावन्न हजार कोटी रुपये खर्च होतात. आणि इथं विनाअनुदानितसाठी अकराशे कोटी द्यायला सरकार मागे पुढे पाहते. मी चप्पल घालावी असं प्रत्येक राजकारण्याला वाटतं. पण मी, ज्या प्रश्नासाठी लढतो, त्याला वाचा फोडण्यासाठी कोणताही राजकारणी पुढाकार घेत नाही. असे का? आम्ही अर्धी लढाई जिंकली आणि अर्धी लढाई अजून बाकी आहे. एक ना एक दिवस आम्ही ही लढाई जिंकूच! त्या दिवशीच चप्पल घालीन. जगदाळे मास्तर बोलत होते आणि मी नुसता ऐकत होतो. 'प्रेस क्लब'मध्ये जगदाळे मास्तर यांच्या सोबत दोन तास कसे गेले, हे कळालेच नाही. जगदाळे मास्तरांनी घड्याळीकडे पाहिलं आणि म्हणाले, माझी गाडी आहे आता. मला निघावे लागेल. उद्या परत सांगलीमध्ये बैठक आहे असे म्हणून नमस्कार करत जगदाळे मास्तर त्यांच्या वाटेला लागले. एकटाच माणूस, त्या रस्त्याने एकामागे एक पाऊल टाकत निघाला होता. त्याच्या प्रत्येक पावलामागे रक्ताचा थेंब पडून त्याचा ठसा उमटत होता. 'तो' रक्ताचा प्रत्येक ठसा 'त्या' अस्वस्थ करणाऱ्या समाजाला त्रासून सोडणाऱ्या यंत्रणेला ओरडून सांगत होता, 'तुम्ही कितीही रस्ते बदला, तुम्ही कितीही त्रास द्या, तुम्ही कितीही अत्याचार करा, मी आंदोलनाचा मार्ग पत्करलेला आहे. आता मी माघार घेणार नाही'. या अस्वस्थ समाजाला जागे करणारा हा नायक कशाचीही तमा बाळगणार नव्हता. अहंकार, स्वार्थीपणा किंवा कुठल्याही पदाचा हव्यास असता, तर जगदाळे मास्तर कधीही 'अस्वस्थ समाजाचा नायक' होऊ शकले नसते. तुमच्या अवतीभवती असे जगदाळे मास्तर अनेक असतील. त्यांना नक्कीच तुम्ही आधार द्या. त्यांच्या लढ्यात सहभागी व्हा. आणि 'तो' आपला लढा आहे, असं समजून पुढे या? येणार ना?

# विनाअनुदानित शिक्षकांना दिलासा ;टप्पा वाढीचा प्रश्न मार्गी

## अधिवेशन संपताच वाढीव टप्प्याचा पगार खात्यात मिळणार: मंत्री गिरिष महाजनांची मोठी घोषणा











मुंबई । प्रतिनिधी

विनाअनुदानित व अंशतः अनुदानित शाळांच्या टप्पा वाढीसाठी लागणाऱ्या निधीच्या मुख्य मागणीसह इतर मागण्या करीता शिक्षक समन्वय संघाच्या वतीने आझाद मैदान, मुंबई येथे सुरू असलेल्या आंदोलनाची गुरूवार दि.९ रोजी मुख्यमंत्री श्री. देवेंद्रजी फडणवीस यांनी दाखल घेतली. शासन आपल्या मागण्यांकडे सकारात्मक दृष्टीकोनातून पाहत असून योग्य निर्णय घेण्यासाठी प्रयत्नशील आहे, असे आश्वासन आंदोलकांनाच्या शिष्टमंडळाशी झालेल्या बैठकीत दिले. त्या नंतर शासनाचे प्रतिनिधी म्हणून थेट आझाद मैदानात येऊन मंत्री गिरीश महाजन यांनी अधिवेशन संपताच वाढीव टप्प्या प्रमाणे आपल्या खात्यात पगार जमा होईल असे सांगून शासनाच्या धोरणा बाबत सविस्तर माहिती दिली. मंत्री गिरिष महाजनांच्या या माहिती नंतर शिक्षकांनी आंदोलन मागे घेतले.

यावेळी आ. श्री. विक्रम काळे, आ. श्री. किशोर दराडे, आ. श्री. ज्ञानेश्वर म्हात्रे, आ. श्री. किरण सरनाईक, आ. श्री. जयंत आजगावकर यांच्यासह शिक्षक बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

मागील दिवसांपासून मुंबईच्या आझाद मैदानात विनाअनुदानित शिक्षकांनी विनाअनुदानित आणि अंशतः अनुदानित शाळांना टप्पा वाढीसाठी निधीची तरतूद करा मागणीसाठी आंदोलन सुरु केले होते. दि. ८ आणि ९ जुलै रोजी राज्यातील सर्व शाळा बंद आंदोलन करण्यात आले होते. सलग दोन दिवस शाळा बंद आंदोलन करून सर्व शिक्षक आझाद मैदानावर आंदोलनात सहभागी झाले होते. त्यामुळे सलग दोन दिवस आझाद मैदान आंदोलक शिक्षकांच्या गर्दीने हाउसफुल झाले होते. या आंदोलनावरुन विधिमंडळात सत्ताधारी आणि



विरोधकांमध्ये आरोप- प्रत्यारोप सुरु झाले होते. विनाअनुदानित शिक्षकांना न्याय मिळावा या मागणीसाठी शिवसेना ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे, राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रमुख शरद पवार, खा. सुप्रिया सुळे यांच्यासह आ. रोहित पवार यांनी देखील शिक्षकांची आझाद मैदानात भेट घेत राज्य सरकारवर जोरदार निशाणा साधला होता. त्यानंतर सरकारने आंदोलक शिक्षकांच्या शिष्टमंडळाची गुरूवार दि.९ रोजी बैठक झाली. या बैठकीत शासन आपल्या मागण्यांकडे सकारात्मक दृष्टीकोनातून पाहत असून योग्य निर्णय घेण्यासाठी प्रयत्नशील आहे, असे आश्वासन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आंदोलकांनाच्या शिष्टमंडळाला दिले. त्यानंतर शासनाचे प्रतिनिधी म्हणून मंत्री गिरीश महाजन यांनी स्वतः आझाद मैदानात येऊन विनाअनुदानित शिक्षकांच्या सर्व मागण्या सरकारने मान्य केल्या असल्याची घोषणा केली. यामुळे विनाअनुदानित शिक्षकांना मोठा दिलासा मिळाला आहे. यावेळी मंत्री गिरीष महाजन म्हणाले की, आमची जी भूमिका आहे ती सकारात्मक आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना आणि सरकारला तुमची काळजी आहे. आम्हाला माहिती आहे की, आपण सामान्य कुटुंबातील आहात. तुमची रोजीरोटी हीच आहे. त्यामुळे धाडसी निर्णय फडणवीसांनी घेतला आहे. त्यानुसार २० टक्के, ४० टक्के त्यानंतर ६० टक्के,८० टक्के पगार खात्यात जमा केला जाणार आहे. सरकारी तिजोरीवरील आर्थिक संकटामुळे आमच्याकडून पुढचे टप्पे देण्यास उशीर झालेला आहे. मात्र आता तुमचा प्रश्न मार्गी लागला आहे. तुमच्या शिक्षकांच्या संघटनेच्या पदाधिकाऱ्यांसोबत झालेल्या बैठकीत हे ठरलं की, आम्हाला तुमच्या खात्यात पगार टाकायचाच आहे. पण या दोन-तीन दिवसात सर्व तांत्रिक बाजू समजावून घेऊन १८ जुलैला अधिवेशन संपेल तेव्हा तुमच्या खात्यात पैसे पडलेले असतील आणि यात कोणताही बदल होणार नाही असं मंत्री गिरिष महाजन यांनी सांगितले. त्या नंतर आंदोलक शिक्षकांनी आंदोलन मागे घेतले.

# अपहरण झालेल्या सालगड्याला वाचवण्यासाठी गेलेले सेवानिवृत्त पोलीस अधिकारी राजाराम सिरसट यांना ऊसतोड मुकादम आणि गुंडाकडून बेदम मारहाण!

## मारहाणीत सेवानिवृत्त पोलीस अधिकारी राजाराम सिरसट गंभीर जखमी ;जिल्हा रुग्णालयात उपचार सुरू

बीड । प्रतिनिधी

बाराशे रुपयासाठी ऊसतोड कामगाराचे मुकादमाने अपहरण केल्याची माहिती मिळताच सालगड्याला वाचवण्यासाठी गेलेले सेवानिवृत्त पोलीस अधिकारी राजाराम सिरसट यांना ऊसतोड मुकादम आणि त्याच्या साथीदारानीन बेदम मारहाण केल्याची घटना काल शुक्रवार दिनांक ११ रोजी माजलगाव तालुक्यातील लऊळ गावात घडली. या घटनेमध्ये सेवानिवृत्त पोलीस अधिकारी राजाराम सिरसट हे गंभीर जखमी झाले असून त्यांच्यावर जिल्हा रुग्णालयात उपचार सुरू आहेत. याप्रकरणी राजाराम सिरसट यांनी माजलगाव ग्रामीण पोलीस ठाण्यात तक्रार दिली असुन याप्रकरणी गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू होती. या घटनेने जिल्ह्यामध्ये एकच खळबळ उडाली.

याबाबत अधिक माहिती अशी की माजलगाव तालुक्यातील किट्टीआडगाव येथील रहिवासी असलेले सेवानिवृत्त पोलीस अधिकारी राजाराम सिरसट यांच्याकडे शेतात काम करण्यासाठी असणारा शेतगडी विश्वनाथ पंडित यांच्याकडे ऊसतोड मुकादम शेख राजू शेख बाबू रा. मंजरथ ता. माजलगाव जि.बीड याचे बाराशे रुपये देणे होते. या बाराशे रुपयांसाठी या मुकादमाने व त्याच्या साथीदारांनी शेतगडी विश्वनाथ पंडित यांचे शुक्रवार दिनांक ११ रोजी सकाळी दहा वाजता अपहरण केले. त्यानंतर त्याला मारहाण करायला सुरुवात केली. त्याने स्वतःचा बचाव करण्यासाठी शेत मालक सेवानिवृत्त पोलीस अधिकारी राजाराम सिरसट यांना फोन करून मारहाण होत असल्याची माहिती दिली. सदर प्रकरणाची माहिती मिळताच सेवानिवृत्त पोलीस अधिकारी राजाराम सिरसट यांनी संबंधित मुकादमा कडे फोनवरून शेतगड्याकडील पैशासंदर्भात विचारले असता मुकादमाने शेतगडी विश्वनाथ पंडित यांच्याकडे दीड लाख रुपये आहेत. दीड लाख रुपये द्या आणि शेतगड्याला घेऊन जा असे सांगितले. त्यामुळे राजाराम सिरसट यांनी दीड लाख रुपये दिल्यास तुम्ही माझ्या शेतगड्याला सोडणार का? असे विचारताच त्यांनी पैसे घेऊन या



त्याला सोडतो असे सांगितले. त्यानंतर राजाराम सिरसट यांनी घरी जाऊन दीड लाख रुपये घेतले व मुकादमाने सांगितलेल्या ठिकाणी गेले. यावेळी शेत गड्याने दीड लाख रुपये

देऊ नका असे सांगितले. त्यामुळे

मुकादम शेख राजू शेख बाबू आणि त्याच्या साथीदारानी शेत गड्यासह शेत मालक सेवानिवृत्त पोलीस अधिकारी राजाराम सिरसट यांना शिवीगाळ करून मारहाण करण्यास सुरुवात केली. दरम्यान

लाठ्या-काठ्या, कु-हाड आणि गुप्ती अशी धारदार शस्त्रे घेऊन झाडीमध्ये लपून बसलेल्या दहा-बारा जणांनी बाहेर येत शेतगडी आणि शेतमालक राजाराम सिरसट यांना मारहाण करायला सुरुवात केली. यावेळी मुकादमाने त्याच्या जवळ असलेल्या रिव्हॉल्वरचा धाक दाखवून पुन्हा मारहाण करायला सुरुवात केली असता पोलीस खात्यातील कैशल्याचा वापर करून राजाराम सिरसट यांनी शिताफिने मुकादमा जवळील रिव्हॉल्वरचा ताबा घेतला. परंतु सदर रिव्हॉल्वर मध्ये बुलेट नाहीत हे मुकादम आणि त्याच्या साथीदारांना माहित असल्यामुळे आपल्याला काही धोका नाही हे सर्वांना ज्ञात होते. त्यामुळे सर्वांनी असुरी हसत पुन्हा जबर मारहाण करायला सुरुवात केली. या मारहाणीत सेवानिवृत्त पोलीस अधिकारी राजाराम सिरसट गंभीर जखमी झाले. या गंभीर जखमी अवस्थेत राजाराम सिरसट यांना जबरदस्ती मोटरसायकलवर बसवून माजलगाव तालुक्यातील ढोरगाव आणि लवूळ शिवारातील घनदाट असलेल्या जंगलात घेऊन जाऊन पुन्हा मारहाण करायला सुरुवात केली. यावेळी सदरील मुकादम आणि त्याच्या साथीदारांनी राजाराम सिरसट यांच्या जवळील दीड लाख रुपये हिसकावून घेत बेदम मारहाण केली. या मारहाणी मध्ये राजाराम सिरसट यांच्या घशाला कोरड पडल्यामुळे त्यांनी मुकादम आणि मारहाण करणाऱ्यांकडे मला मारू नका, मी मरेन, मला पाणी द्या अशी विनंती करून पिण्यासाठी पाणी मागितले असता या गुंडांनी त्यांच्या तोंडावर लघुशंका केली. यावर हे लोक थांबले नाहीत यांनी त्यांच्या कानात नको ती कृती करण्याचा प्रयत्न केला. दरम्यान



आपल्या साहेबासोबत अमानुष कृत्य करत आहेत आणि बेदम मारहाण करत आहेत हे पाहून घाबरलेला शेतगडी त्या ठिकाणाहून पळून गेले व त्यांनी राजाराम सिरसट यांच्या मुलाला फोन करून मुकादम आणि त्याचे साथीदार जबर मारहाण करत आहेत. तुम्ही ताबडतोब या असे फोन द्वारे सांगितले. आपल्या वडिलांना मारहाण होत असल्याचे समजताच राजाराम सिरसट यांचा मुलगा विजयकुमार सिरसट यांनी वडीलांना फोनवरून संपर्क साधला असता मुकादम व त्याच्या साथीदारांनी राजाराम सिरसट यांना कोणाचा फोन आहे असे म्हणत फोन उचलण्यासाठी सांगितले. त्यावेळी राजाराम सिरसट यांनी आपल्या मुलाला फोनवरून मला लऊळ गावातील सैलानी बाबा परिसरात मुकादम आणि त्याचे काही साथीदार मारहाण करत आहेत ताबडतोब ये असं निरोप दिला. आपल्या वडिलांना मारहाण होत असल्याने विजयकुमार सिरसट मित्रांना घेऊन वडिलांना वाचवण्यासाठी घटनास्थळी पोहोचले. यावेळी राजाराम सिरसट यांचा मुलगा आणि त्याचे मित्र येत असल्याचे पाहून मुकादम व त्याच्या गुंडांनी गंभीर जखमी झालेल्या राजाराम सिरसट यांना पुन्हा गाडीवर बसवून घेऊन पळून जाण्याचा प्रयत्न केला. यावेळी रस्त्यावर

चिखल असल्याने मोटारसायकल चिखलात स्लिप झाली व मोटारसायकलवरील तिघे खाली पडले. त्यावेळी राजाराम सिरसट यांचा मुलगा व त्याचे मित्र घटनास्थळी येताच मारहाण करणारे गुंड पळून गेले. दरम्यान या वेळी मारहाण करणाऱ्या मुकादमाला विजयकुमार सिरसट यांच्या मित्रांनी पकडून माजलगाव पोलीस ठाण्यात आणले. सेवानिवृत्त पोलीस अधिकारी राजाराम सिरसट यांनी मारहाण करणाऱ्या मुकादम आणि त्याच्या साथीदाराच्या विरोधात तक्रार दिली असून आज शनिवार दिनांक १२ रोजी सायंकाळी उशिरापर्यंत गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू होती. या मारहाणीत राजाराम सिरसट हे गंभीर जखमी झाले असून त्यांच्यावर बीड येथील जिल्हा रुग्णालय उपचार सुरू आहेत.

किरकोळ पैशासाठी मुकादम आणि त्याच्या साथीदारांकडून सेवानिवृत्त पोलीस अधिकाऱ्यांना अमानुष आणि गंभीर मारहाण होते हे बाब अतिशय गंभीर आणि अमानवी आहे. या घटनेने जिल्ह्यात एकच खळबळ उडाली.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक संपादक श्री आत्माराम पांडुरंग वाव्हळ यांनी सचिन ऑफसेट, सुभाष रोड, बीड येथे छापून साप्ताहिक संघर्ष यात्रा कार्यालय, गोविंद नगर धानोरा रोड बीड ता. जि. बीड (महाराष्ट्र)- ४३ ११ २२ येथे प्रकाशित केले मो. ८२ ७५ २६ ८५ ८९ या अंकातील विचारांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (बीड न्यायालय कक्षेत)